# 2022 - 23 च्या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी करावयाच्या कार्यांचे प्रमुख अंश-

1. इयत्ता पाचवी आणि आठवी च्या SA2 च्या मूल्यमापनाबरोबरच इयत्ता पहिली ते नववीच्या मूल्यमापनाच्या निकालांचे एकत्रीकरण करून दिनांक 8/4/2023 रोजी प्राथमिक विभाग आणि दिनांक 10/4/2023 रोजी प्रौढ शाळा यांचे समुदाय दत्त कार्यक्रम / पालक सभा घेऊन चर्चा करणे.

2. शाळेच्या स्थानिक रजांसाठी निर्दिष्ट केलेले दिवस क्षेत्र शिक्षणाधिकाऱ्यांकडून जून 2023 च्या पहिल्या आठवड्यापर्यंत मंजूर करून घेणे.

3. दिनांक 10/04/2023 ला 2022- 23 हे शैक्षणिक वर्ष संपते. पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा निकाल तयार करून त्याचे एकत्रीकरण करून नियमानुसार ग्रेड घालून दिनांक 25/4/2023 च्या पूर्वी SATS मध्ये भरणे.

4. दिनांक 14/4/2023 रोजी डॉक्टर बी आर आंबेडकर यांची जयंती सर्व प्राथमिक आणि प्रौढ शाळा मुख्य शिक्षक सह शिक्षक आणि एसडीएमसी/ खाजगी शाळांना संबंधित कार्यकारी समिती आणि विद्यार्थी यांच्या सहभागाने तसेच पूर्व तयारीने साजरी करणे.

5. 2023 -24 या वर्षासाठी सरकारी शाळांच्या इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना काही तालुक्यांमध्ये पहिला सेट मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तक तसेच खाजगी शाळांना पाठ्यपुस्तक देण्यास सुरुवात झालेली आहे. हे गणवेश मुख्याध्यापकांमार्फत विद्यार्थ्यांना पोहोचवली जावीत. पहिल्या टप्प्यात दिनांक 10/4/2023 पर्यंत आणि मग टप्प्याटप्प्याने इतर मुलांना देऊन शाळा प्रारंभोत्सव कार्यक्रमामध्ये मुलांना गणवेश घालून येण्यास सिद्ध करणे.

6. दिनांक 11/4/2023 पासून दिनांक 28/5/2023 पर्यंत शाळांना उन्हाळी सुट्टी घोषित केल्यामुळे शाळा मुख्याध्यापकांनी सर्व दस्तऐवज आणि दाखले आणि अक्षर दासोह कार्यक्रमासाठी आवश्यक मध्यान्ह आहाराचे साहित्य सुरक्षितपणे संग्रहित करावे. तसेच विधानसभा मतदान कार्यासाठी मतदान केंद्र म्हणून शाळा वापरण्यासाठी शाळांनी सहकार्य करावे

Prepared by : Kishor Shitole